NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

(पोलीस वार्तापत्र)

(सायंकाळ)

दिनांक २७.१०.२०२६ मंगळवार

१) मा. पोलीस आयुक्तांची ऑटोरिक्षा चालकांसोबत बैठक :– नियमांचे काटेकोरपणे पालन करण्याच्या सुचना

नागपूर शहरातील वाहतुक व्यवस्था सुरळित व सुरक्षित ठेवण्याचे दृष्टीने मा. श्री विश्वास नांगरे पाटील, पोलीस आयुक्त, नागपुर शहर यांचे अध्यक्षतेत आज दिनांक २७.१०.२०२६ चे सायंकाळी १७.०० वा. पोलीस भवन येथील कॉन्फरन्स हॉल येथे ऑटोरिक्षा चालकांची बैठक आयोजित करण्यात आली होती. बैठकीस मा. श्री राजेंद्र दाभाडे, अपर पोलीस आयुक्त, गुन्हे तसेच, मा. श्री. आदित्य मिरखेलकर, पोलीस उपआयुक्त, वाहतुक शाखा, नागपूर शहर हे प्रामुख्याने हजर होते.

मा. पोलीस आयुक्त यांनी बैठकीस संबोधीत करतांना, ऑटोरिक्षा चालकांनी वाहतुक नियमांचे काटेकोरपणे पालन करणे, प्रवाशांची सुरक्षितता सुनिश्चित करणे आणि शहरातील वाहतुक व्यवस्था शिस्तबध्द ठेवण्याकरीता सहकार्य करणे याबाबत मार्गदर्शन केले. तसेच, ऑटोरिक्षामध्ये चालकाव्यतिरिक्त क्षमतेपेक्षा जास्त प्रवासी बसवु नयेत, प्रतिबंधीत क्षेत्रामध्ये ऑटोरिक्षा चालवु नये असे स्पष्ट निर्देशही दिलेत. त्याप्रमाणे वाहतुक नियमांचे उल्लंघन केल्याने इतर वाहन चालकांसह सर्वसामान्य नागरिकांनाही नाहक अडचणींचा सामना करावा लागतो. करीता प्रत्येक ऑटोरिक्षा चालकाने वाहतुकीचे नियंमाचे काटेकोर पालन करुन, जबाबदारीचे वाहन चालवुन, नागरिकांशी सौजन्यपुर्ण व्यवहार करावा. ऑटोरिक्षा चालकांनी प्रवाश्यांचे सुरक्षिततेस प्राधान्य देऊन वाहतुकीस अडथळा निर्माण होऊ नये अशा ठिकाणी आपले वाहन उभे करावे. त्याचप्रकारे नागपुर शहरातील वाहतुक व्यवस्था अधिक सुरक्षित, सुरळीत व शिस्तबध्द ठेवण्यासाठी पोलीस प्रशासन प्रयत्नशील असुन, संपुर्ण ऑटोरिक्षा चालकांनी वाहतुक पोलीसांना सहकार्य असे, मा. पोलीस आयुक्तांनी ऑटोरिक्षा चालकांना असे आवाहन केले.





२) उत्कृष्ट तपास करणारे अधिकारी व अंमलदार यांचा मा. अपर पोलीस आयुक्त, उत्तर प्रादेशिक विभाग यांचे हस्ते गौरव.

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय, उत्तर प्रभाग अंतर्गत येणारे पोलीस ठाणे कपिलनगर व सिताबर्डी येथे दाखल असलेल्या वाहनचोरीचे गुन्ह्यातील आरोपींचा शोध घेऊन, गुन्हा उघडकीस आणून, गुन्ह्यातील मुद्येमाल मोठ्या संख्येने हस्तगत करणारे पोलीस अधिकारी व अंमलदार यांचा आज दिनांक २७.१०.२०२६ चे १७.००

वा. चे सुमारास मा. श्रीमती विनिता शाहु, अपर पोलीस आयुक्त, उत्तर प्रभाग, नागपूर शहर यांनी त्यांचे दालनात पुष्पगुच्छ देऊन गौरव केला.

पोलीस ठाणे कपिलनगर येथे दाखल अप.क्र. ८२४/२६ कलम ३०३(२) भान्यासं. या वाहनचोरीचे गुन्हयाचा कौशल्यपुर्ण व तांत्रिक तपास करुन, आरोपींना निष्पन्न करुन, गुन्ह्यातील आरोपींना अटक केली. आरोपींकडुन पोलीस ठाणे जरीपटका, सक्करदरा, मानकापुर व अंबाझरी येथील वाहनचोरीचे इतर ०५ गुन्हेसुध्दा उघडकीस आणुन, आरोपीकडुन एकुण ०९ दुचाकी वाहने किंमती ६,३०,०००/—रू. चा मुद्येमाल जप्त केला. ही उल्लेखनिय कामगिरी करणारे वपोनि. श्री. सतिश आडे, दुपोनि. राजेश पाटील, पोउपनि. प्रशांत राऊत, पोहवा. शेख, सुरेश मिश्रा, पोअं. चंद्रशेखर डोंगरे, निलेश पवार, रितेश वर्मा, सागर बघेल, मुकेश हलमारे व विवेक सावरकर यांना, तसेच. पोलीस ठाणे सिताबर्डी येथे दाखल अप.क्र. ५४२/२६ कलम ३०३(२) भान्यासं. या वाहनचोरीचे गुन्ह्याचा कौशल्यपुर्ण व तांत्रिक तपास करुन, आरोपींना निष्पन्न करुन, आरोपींना अटक केली. आरोपींकडुन वेगवेगळया पोलीस ठाणे अंतर्गत वेगवेगळे वाहनचोरीचे गुन्हे उघडकीस आणुन, त्याचेकडुन एकुण १२ दुचाकी वाहने कि. ४,९५,०००/—रू. चा मुद्येमाल जप्त केला. ही उल्लेखनिय कामगिरी करणारे वपोनि. श्री. सुहास राऊत, पोउपनि. श्याम वारंगे, पोहवा. नंदकिशोर वालदे, पोअं. शत्रुघ्न मुंडे, प्रशांत भोयर, चेतन शेंडे व नैनिश तलवारे अशा एकुण ०३ पोलीस अधिकारी व १३ पोलीस अंमलदार यांना प्रशस्तीपत्र व पुष्पगुच्छ देऊन, यापुढेही भविष्यात त्यांनी अशाच प्रकारे गुणवत्तापुर्ण व लोकाभिमुख कामगिरी करण्याकरीता त्यांचा गौरव करून, सर्व सत्कार मुर्तींना प्रोत्साहीत करण्यात आले.





(कामगिरी)

<u>१) गुन्हेशाखा वाहन चोरी विरोधी पथक पोलीसांची कामगिरी :— नायलॉन मांजा बाळगणाऱ्या ईसमांस अटक.</u>

दिनांक २७.१०.२०२६ चे ००.०१ ते ०२.०० वा. चे दरम्यान, गुन्हेशाखा वाहन चोरी विरोधी पथकाचे अधिकारी व अंमलदार हे पेट्रोलींग करीत असतांना, त्यांनी मिळालेल्या खात्रीशीर माहितीच्या आधारे, पोलीस ठाणे वाठोडा हद्दीत, सिम्बॉयसीस कॉलेज रोड, जनता गॅरेज समोर, बिडगाव येथे ऑटोरिक्षा क्र. एम.एच ४९ सि.एफ २२७४ ला थांबवुन, चालकास त्याचे नांव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नांव साजिद अहमद शकील अहमद, वय २८ वर्षे, रा. अन्सार नगर, चॉंद हॉटेल जवळ, डोबीनगर, तहसिल, नागपुर असे सांगीतले. त्याचे ऑटोमधील बोरींची पाहणी केली असता, त्याचे ताब्यात शासनाने प्रतिबंधीत केलेला मोनाकाईट व मोनोकाईट गोल्ड कंपनीचे नायलॉन मांजाचे एकुण ३६० नग चक्की मिळुन आल्या. त्याचे ताब्यातुन चक्की, मोबाईल फोन व ऑटोरिक्षा असा एकुण १३,९०,०००/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. इसमांस अधिक विचारपुस केली असता, त्याने नमुद मुद्देमाल त्याचा साथीदार पाहीजे आरोपी नामे बद्रे आलम रा. पिवळी नदी, यशोधरानगर, नागपुर तसेच मोबाईल क्र. ९४६४८०९४५७ चा धारक यांचेकडुन माजरी येथुन आणुन सिम्बॉयसिस कॉलेजजवळ वाठोडा येथे आणल्याचे सांगितले. तिन्ही आरोपींचे कृत्य हे कलम २२३ भा.न्या.सं., सहकलम ५,१५ पर्यावरण संरक्षण अधिनियम—१९८६ अन्वये होत असल्याने आरोपींविरूध्द पोलीस ठाणे वाठोडा येथे गुन्हा दाखल करण्यात

आला आहे. आरोपी ऑटोरिक्षा चालकास मुद्देमालासह पुढील कारवाईकामी वाठोडा पोलीसांचे ताब्यात देण्यात आले. पाहीजे आरोपींचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. विश्वास नांगरे पाटील, पोलीस आयुक्त, नागपूर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह. पोलीस आयुक्त, नागपूर शहर, मा. श्री. राजेंद्र दाभाडे अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री. दीपक अग्रवाल, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. वैभव जाधव, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली, सपोनि. नितीन चुलपार, सफौ. दीपक रिठे, पोहवा. शंभुसिंग किरार, सचिन बढीये, किशोर सोमकुंवर, विवेक कावडकर व पोअं. राहुल कुसरामे यांनी केली.



२) <u>गुन्हेशाखा युनिट क्र. ३ पोलीसांची कामगिरी :– वैद्यकीय उपचाराचे नावाखाली फसवणुक करणाऱ्या आरोपीस अटक.</u>

फिर्यादी गोपाल पांडुरंग निमजे, वय ७३ वर्ष, रा. व्हीएचबी कॉलनी, प्लॉट क्र. ७७, हनुमान मंदीरसमोर, शांतीनगर, नागपुर यांना मधुमेह आजार असुन, त्यांचे दोन्ही पाय सुजलेले असतात. फिर्यादी हे दिनांक २६.१०.२०२६ रोजी खाजगी कामाने राणी दुर्गावती चौक येथे गेले असता, तेथे त्यांना दोन अनोळखी इसम भेटले. त्यातील एकाने आपले नाव अरुण सांगुन, त्याचेही वडीलास असाच आजार होता व त्यांचा उपचार हरीद्वार येथे एका डॉक्टरांकडे केल्याने ते बरे झाल्याचे सांगितले. फिर्यादीस 'तुमचाही उपचार बरा करायचा असल्यास, तुमचा पत्ता द्या' असे म्हणुन त्या इसमांनी फिर्यादीचा पत्ता व फोन नंबर घेतला. त्यानंतर फिर्यादीस दिनांक २७.१०.२०२६ चे ०८.३० वा. चे सुमारास मोबाईल क्र. ९९६०६६३९७६ चे धारकाने फोन करुन, तो डॉक्टर असल्याची बतावणी करुन, ' मी आपले घराजवळ तुमच्या उपचाराकरीता आलो आहे' असे म्हटल्यावर, फिर्यादीने मोबाईल धारक व त्याचा सोबती यांना घरी बोलाविले. त्यांचेकडून उपचार करुन घेत असता, त्यांनी फिर्यादीस सांगितले की, तुमच्या पायात पस झाला असुन, पस काढण्यासाठी १०० कांड्या लागतील. फिर्यादीचा उपचार करुन, त्या इसमांनी फिर्यादीस १०० कांडया पस काढला असुन, प्रति कांडी ३,५००/– रु. प्रमाणे एकुण ३,५०,०००/– रु. झाले आहेत असे सांगितल्याने, त्यांना फिर्यादीने त्यांचे घरातील रोख ३,५०,०००/–रू. दिल्याने, ते इसम पैसे घेऊन तेथुन निघुन गेले. फिर्यादीस कोणताही आराम न झाल्याने, फिर्यादी यांनी मोबाईल धारकास संपर्क करण्याचा वांरवांर प्रयत्न केला असता, नमुद मोबाईल क्रमांक बंद असल्याचे दिसुन आले. फिर्यादीस आपली फसवणुक झाल्याचे लक्षात आल्याने, फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरुन पोलीस ठाणे शांतीनगर येथे कलम ३१८(४),३(५) भान्यासं. अन्वये आरोपींविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला.

गुन्हयाचे तपासादरम्यान, गुन्हेशाखा युनिट क्र. ३ पथकाचे अधिकारी व अंमलदार यांना नमुद गुन्हयाची माहिती प्राप्त होताच, त्यांनी घटनास्थळी तात्काळ भेट देऊन व परिसरातील सीसीटिव्ही कॅमेरा फुटेजची पाहणी केली. तसेच, गुप्त बातमीदार मार्फतीने प्राप्त माहितीवरुन आरोपींना निष्पन्न करुन, आरोपी नामे मोहम्मद बबलु

मोहम्मद सलिम वय ४० वर्ष रा. गाव बुंदी जि. कोटा, राजस्थान यास अवघ्या दोन तासात ताब्यात घेतले. आरोपीस विचारपुस केली असता, त्याने वर नमुद गुन्हा त्याचा साथीदार पाहिजे आरोपी मोहम्मद सलाम नुरुद्दीन वय ४५ वर्ष रा. बुंदी, राजस्थान याचेसह संगनमताने केल्याची कबुली दिली. आरोपीचे ताब्यातुन संपुर्ण मुद्येमाल रोख व गुन्हयात वापरलेले दुचाकी वाहन असा एकुण ४,५०,०००/—रू. चा मुद्येमाल जप्त करण्यात आला आहे. आरोपीस मुद्येमालासह पुढील कार्यवाहीस्तव शांतीनगर पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पाहिजे आरोपीचा शोध व पुढील तपास सुरु आहे.

वरील कामगिरी मा. श्री. विश्वास नांगरे पाटील, पोलीस आयुक्त, नागपूर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह. पोलीस आयुक्त, नागपूर शहर, मा. श्री. राजेंद्र दाभाडे अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री. दीपक अग्रवाल, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. वैभव जाधव, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली, पोनि. अतुल मोहनकर, पोउपनि. मधुकर काठोके, सफौ. संतोषसिंग ठाकुर, पोहवा. विजय श्रीवास, मनोज नेवारे, पोअं. दिपक लाकडे, दिपक दासरवार, चंद्रशेखर डेकाटे व प्रमोद यांनी केली.



३) <u>गुन्हेशाखा युनिट क्र. ६ पोलीसांचे कामगिरी :— खुनाचे गुन्हयातील पाहिजे आरोपीस अटक</u>.

फिर्यादीचा भाऊ नामे प्रशांत मुकेश घोडेस्वार वय ३२ वर्ष रा. वार्ड क्र. ४, खापरखेडा, नागपुर हे पोलीस ठाणे खापरखेडा हद्दीत, वार्ड क्र. २, गांवडे कॉम्प्लेक्स समोर त्यांचा चायनीज ठेला लावित होते. दिनांक २१.०१.२०२१ चे ०२.३० वा. चे सुमारास, आरोपी १) सुधिर उर्फ चेप्या पिपळे २) सागर माहुरकर ३) कासिम अयुब पठान ४) सुलतान रहीत गडकनोजे ५) आनंद शिंदे ६) आशिष भड ७) प्रशांत चौधरी यांनी संगनमत करुन, फिर्यादीचे भावासोबत चायनिज ठेला हटविण्याचे कारणावरुन वादविवाद करुन, त्यांना धारदार शस्त्राने मारुन, जिवे ठार केले होते. याप्रकरणी पोलीस ठाणे खापरखेडा येथे कलम ३०२,३४ भादंवि सहकलम ४,२५ भाहका, सहकलम ३(२)(५) अ.जा.अ.ज.अ.प्र.कायदा अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. गुन्ह्याचे तपासादरम्यान, आरोपी क्र. १ ते ६ यांना अटक करण्यात आली होती. आरोपी क्र. ७ हा गुन्हा घडल्यापासुन आपले अस्तित्व लपवुन राहील्याने गुन्हयात पाहिजे होता.

गुन्ह्याचे समांतर तपासादरम्यान, गुन्हेशाखा युनिट क्र. ६ पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी तांत्रिक तपास करून व मिळालेल्या खात्रीशीर माहीतीवरून, पाहिजे आरोपी नामे प्रशांत उर्फ सोनु शंकर चौधरी वय ३४ वर्ष रा. दत्तनगर, मुन्ना गॅरेज जवळ, वार्ड क्र. २, खापरखेडा, नागपूर यास पोलीस ठाणे खापरखेडा हद्दीतील चनकापुर, डब्ल्युसीएल कॉलनी येथुन ताब्यात घेतले. आरोपीस अधिक विचारपुस केली असता, त्याने वर नमुद गुन्हा संगनमताने केल्याने कबुल केले. तसेच, सन २०१५ मध्ये पोलीस ठाणे देवळी जि. वर्धा येथे दाखल अपहरणासह खुनाचा गुन्हा तसेच, सन २०१९ मध्ये पोलीस ठाणे खापरखेडा जि. नागपूर येथे जबरी चोरीचा गुन्हा केल्याची कबुली दिली. आरोपीस अटक करुन, पुढील कार्यवाहीस्तव खापरखेडा पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. विश्वास नांगरे पाटील, पोलीस आयुक्त, नागपूर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह. पोलीस आयुक्त, नागपूर शहर, मा. श्री. राजेंद्र दाभाडे अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री. दीपक अग्रवाल, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. वैभव जाधव, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली, पोनि. भरत कऱ्हाडे, सपोनि. सचिन गायकवाड, पोउपनि. राहुल रोटे, सफौ. मुकेश खांडरे, पोअं. दिनेश महल्ले, सुनिल यादव व चापोहवा. चंद्रशेखर भारती यांनी केली.



(गुन्हे)

<u>पोलीस ठाणे पाचपावली :–शस्त्र बाळणाऱ्या आरोपीस अटक.</u>

दिनांक २७.१०.२०२६ चे १३.४० वा. चे सुमारास, पाचपावली पोलीसांचे तपास पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असतांना, बारसे नगर, कलकत्ता रेल्वे पटरीजवळ एक इसम संशयास्पदरितीने दिसल्याने, त्याचेजवळ जात असता, तो पोलीसांना पाहुन पळू लागला. त्याचा पाठलाग करुन त्यास ताब्यात घेतले. पंचासमक्ष त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव मेहुल अरविंद चव्हाण वय ३९ वर्षे, रा. घर क्र. ९८, बारसे नगर, पाचपावली, नागपुर असे सांगीतले. त्याची अंगझडती घेतली असता, त्याचे ताब्यातएक लोखंडी तलवार किंमती १,०००/–रू. ची मिळुन आल्याने जप्त करण्यात आली.

आरोपी हा कोणतातरी दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने धारदार तलवार बाळगतांना समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, सरतर्फे फिर्यादी पोहवा प्रविण वावरकर यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे अजनी येथे पोउपनि विनायक बुवा यांनी आरोपीविरूध्द कलम ४,२५ भा.ह.का., सहकलम १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

(अकस्मात मृत्यु)

<u>पोलीस ठाणे मानकापुर:–</u> दिनांक २४.१०.२०२६ चे २१.०० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे मानकापुर हद्दीत प्लॉट क्र. ७५, खान ले आऊट, गोधनी, नागपुर येथे राहणारे ईसम नामे मुकेश रमेश बावरिया वय ४३ वर्षे हे बिल्डींगचे २रे माळ्यावरुन जिन्याने खाली उतरत असतांना, अचानक त्यांचा पाय घसरल्याने, ते डोक्याचे भारावर खाली पडुन गंभीर जखमी झाले. त्यांना उपचाराकरीता मेडीकल हॉस्पीटल येथे दाखल केले होते. उपचारादरम्यान दिनांक २६.१०.२०२६ चे ०८.३० वा. डॉक्टरांनी तपासुन मृत घोषीत केले.

याप्रकरणी प्राप्त वैद्यकीय सुचनेवरून पोलीस ठाणे मानकापुर येथे पोउपनि. अजय जाधव यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

(मिसींग)

<u>१) पोलीस ठाणे पाचपावली</u> :– फिर्यादी सौ. मोनिका दिनेश राऊत वय ४७ वर्षे, रा. खाटीक मोहल्ला, स्वामी नगर, ठक्करग्राम, पाचपावली नागपूर यांनी पोलीस ठाणे पाचपावली येथे तक्रार दिली की, त्यांचे पती नामे दिनेश

गोविंदा राऊत वय ५८ वर्षे, हे दिनांक २०.०८.२०२६ चे १०.०० वा. पासुन पोलीस ठाणे पाचपावली हद्दीतील राहते घरुन बेपत्ता झाले आहेत. त्यांचा शोध घेतला असता, मिळून आले नाहीत. कोणीतरी अज्ञात इसमाने त्यांचे अपहरण केले असावे अशा फिर्यादीचे तक्रारीवरुन पोलीस ठाणे पाचपावली येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम १३८,१४०(३) भान्यासं अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. **वर्णन** रंग–सावळा, चेहरा–लांबट, बांधा–सडपातळ, उंची–५ फुट ३ इंच, डोळे–काळे, केस–काळे पांढरे, दाढी–पांढरी वाढलेली, अंगात–पांढरी टिशर्ट व मोरपंखी रंगाचा पॅन्ट घातलेला आहे. भाषा–हिंदी/मराठी बोलतात. ओळखचिन्ह–अडखळत बोलता व चालतात.

२) पोलीस ठाणे पाचपावली :– फिर्यादी सुमित राजेश साखरे वय २७ वर्षे, रा. प्लॉट क्र. ३३६, लष्करीबाग, गोटे आटाचक्कीजवळ, पाचपावली नागपूर यांनी पोलीस ठाणे पाचपावली येथे तक्रार दिली की, त्यांचे नातेवाईक महिला नामे श्रीमती कल्पना शिवनारायण शाहारे वय ५५ वर्षे हया दिनांक १४.१०.२०२६ चे ०६.०० वा. पासुन पोलीस ठाणे पाचपावली हद्दीतील राहते घरुन बेपत्ता झाल्या आहेत. त्यांचा शोध घेतला असता, मिळून आले नाहीत. कोणीतरी अज्ञात इसमाने त्यांचे अपहरण केले असावे अशा फिर्यादीचे तक्रारीवरुन पोलीस ठाणे पाचपावली येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम १३८,१४०(३) भान्यासं अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. **वर्णन** रंग–सावळा, चेहरा–लांबट, बांधा–मजबुत, उंची–४ फुट ५ इंच, डोळे–काळे, केस–काळे लांब, अंगात–निळया रंगाचा सलवार सुट घातलेला आहे. भाषा–हिंदी/मराठी बोलतात. मानसिक रुग्ण आहेत.



दिनेश



कल्पना

(ईतर)

आरोपींनी न्यायालयात हजर होणेबाबत :–

मा. विद्यमान न्यायाधीश यांनी त्यांचे कोर्टातील केस क्र. व कलम मधील खालील नमुद आरोपी/साक्षीदार हे तारखेवर सतत गैरहजर राहत असल्याने त्यांचेविरुध्द जाहीरनामा प्रसिध्द केला आहे. खालील तक्त्यात नमुद आरोपी / साक्षीदार यांनी नमुद तारखेपर्यंत मा. न्यायालयासमोर हजर व्हावे.

अ	कोर्टाचे नाव	केस क्र.	कलम	आरोपीचे नाव व पत्ता	पेशी तारीख
१.	मा. १२ वे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर तथा प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी, नागपुर.	३०११६९/ २००८	कलम २९४, ५०६ ब,३४ भा.दं.वि.	१) अनिल नागोराव साकोळे वय ४६ वर्ष रा. अत्रे ले आऊट, प्रतापनगर, नागपुर. २) त्रिभुवनदास काशिनाथ तिवारी वय ४४ वर्ष ३) रामजी काशिनाथतिवारी वय ४३ वर्ष दोन्ही रा. गोपाल नगर, तिसरा बसस्टॉप, प्रतापनगर, नागपूर ३) रामजी	३०.१०.२०२६

स्वा/—
(अंकुश राठोड)
पोलीस उप निरीक्षक,
पोलीस जनसंपर्क अधिकारी,
नागपुर शहर.

वाहतुक शाखा प्रेसनोट

नागपूर शहरातील गांधीबाग, इतवारी, कळमना, सिताबर्डी तसेच शहरातील इतर सर्व प्रमुख बाजारपेठ व व्यापारी परिसर येथे मालवाहू वाहने, ट्रान्सपोर्ट वाहने, व्यावसायिक वाहने अथवा माल वाहतुकीसाठी वापरण्यात येणाऱ्या इतर वाहनांमधून माल चढविणे अथवा उतरविणे (Loading/Unloading) हे दुपारी १४.०० ते रात्री २०.०० वाजेपर्यंत पूर्णत: प्रतिबंधित करून होणाऱ्या वाहतूक कोंडीवर नियमन व नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे. तसेच सार्वजनिक सुरक्षितता, वाहतुकीची सुरळीत व सुरक्षित हालचाल, वाहतूक कोंडी टाळणे आणि नागरिकांची गैरसोय कमी करणे या दृष्टीकोनातुन अधिसुचना काढणे आवश्यक आहे. रस्त्यावर वाहतूकीची कोंडी निर्माण होवू नये, त्यामुळे वाहतुक वळविण्याबाबत खालील प्रमाणे अधिसुचना निर्गमित करण्यात आली आहे.

- वाहनामधून माल चढविणे व उतरविण्यास तात्पुरता प्रतिबंध :— नागपूर शहरातील गांधीबाग, ईतवारी, कळमना, सिताबर्डी, तसेच शहरातील इतर सर्व प्रमुख बाजारपेठा व व्यापारी परिसर येथे मालवाहू वाहने, ट्रान्सपोर्ट वाहने, व्यावसायिक वाहने अथवा माल वाहतुकीसाठी वापरण्यात येणाऱ्या इतर वाहनांमधून माल चढविणे अथवा उतरविणे (Loading/Unloading) पूर्णत: प्रतिबंधित राहील. या दरम्यान रस्त्यावर, रस्त्याच्या कडेला, सर्व्हिस रोडवर, बाजारपेठेच्या प्रवेश मार्गावर किंवा वाहतुकीच्या प्रवाहास अडथळा निर्माण होईल अशा कोणत्याही ठिकाणी दुपारी १४.०० ते रात्री २०.०० वाजे पर्यंत माल चढविणे अथवा उतरविणे असे कार्य करता येणार नाही. दिलेल्या नमूद कालावधीत माल चढविणे व उतरविण्यास प्रतिबंध राहील.
- **निर्बंध लागू असलेले क्षेत्र :—** १. गांधीबाग बाजार परिसर २. ईतवारी बाजार परिसर ३. कळमना बाजार बाहेरील परिसर ४. सिताबर्डी बाजार परिसर

  तसेच नागपूर शहरातील इतर सर्व प्रमुख बाजारपेठ, व्यापारी परिसर व गर्दीची ठिकाणे, ज्या ठिकाणी माल चढविणे अथवा उतरविण्यामुळे वाहतुकीस अडथळा निर्माण होतो किंवा वाहतूक कोंडी होण्याची शक्यता असते.
- **अत्यावश्यक सेवा** :— रुग्णवाहिका, अग्निशमन, पोलीस वाहने तसेच इतर आपत्कालीन सेवेसाठी वापरण्यात येणाऱ्या वाहनांना, आपत्कालीन परिस्थितीत कार्यरत असताना, सदर निर्बंधातून आवश्यक ती सूट राहील.

सदर अधिसूचना दिनांक २७.१०.२०२६ ते दिनांक २६.११.२०२६ पर्यंत अंमलात राहील.

नागपूर शहरातील सर्व वाहन चालकांनी या अधिसुचनेचे पालन करून आपली होणारी गैरसोय टाळावी व पोलीसांना सहकार्य करावे.

स्वा/—
(आदित्य मिरखेलकर, भापोसे)
पोलीस उप आयुक्त, वाहतूक,
नागपूर शहर